

गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पाश्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या ऽ निशजनितमहे शीलधिक्षेत्रधिभिन्न ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रम्हैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥



वर्ष १९ | अंक ४-५-६
सन १९४२ | एप्रील-मे-जून


# श्रीसद्गुरु साईनाथ

## विनंती

ज्यांनी साईलीलेची वर्गणी सन १९४२ सालची ( चालू सालची अद्याप पाठविली नसेल त्यांनी अंक पोंचतांच पाठवावी.

# गलेफाचें माप




ज्या भक्तांना गलेफ पाठवावयाचा असेल त्यांनीं वर दाखविल्याप्रमाणें मापांत पाठवावा.

# श्रीसाईगाथामृत

## प्रकरण ७ वें

## दासगणू महाराज

### ( उर्फ गणपतराव दत्तात्रय सहस्रबुद्धे )

### अर्वाचीन महिपती ( संतचरित्रकार )

### आणि

### सुप्रसिद्ध कीर्तनकार

( मागील अंकावरून चालू )

भेटले आणि मी शिरडीस जाणार आहे काय असें विचारूं लागले. 'हांव
आत्तांच नाही, कांहीं थोड्या महिन्यांनीं जाईन' असें मी उत्तर दिलें. नंतर
ीं मजपाशीं एक नारळ देऊन मला सांगितलें कीं, साईबाबांना हें माझें श्रीफळ
ण करा. मी तें घेऊन माझ्या पिशवींत ठेवून दिलें. पुढें प्रवास करीत असतां
श मित्रांनीं तें घेऊन खाऊन टाकिलें. नंतर मी शिरडीस साईबाबांचें दर्शन
च ते म्हणाले, हा पहा चोर. माझ्या बंधूनें दिलेलें श्रीफळ कुठें आहे ?

टीप—ही कथा थोडीशी निराळी अशी श्रीसाईसच्चरित अध्याय ५१, ओव्या
ते १८३ येथें सविस्तर दिलेली आहे तेथें दासगणूचें नांव नसून श्री टेंबे
ीनीं नांदेडचे वकील पुंडलिकराव यांचेकडे राजमहेंद्रीत बाबांना अर्पण करणेसाठी
दिला आणि त्यांनीं तो वाटेंत मित्रांसमवेत तिखट चिवड्याबरोबर खाऊन
इत्यादि वर्णन आहे आणि यापासून काय बोध घ्यावा हें सांगितलें आहे. तें
ंनीं पठण मनन करण्यास योग्य आहे.

एका मित्रानें अगदीं थोडी किंमत घेऊन मला कांहीं जमीनी दिल्या. त्यांचे
ांतून माझा उदरनिर्वाह चालतो. भक्तिसारामृतांत सांगितलेली दरवडेखोरांपासून
झालेल्या बेरे यांच्या तांब्याची कथा मला स्वतः माहीत आहे. बेरे यांचे
८ मी त्या ठिकाणीं होतों.

माझ्या कीर्तनाकरितां मी कांहीं पैसे घेत नाहीं. पूर्वी कधींहि घेतलें नाहीं. कीर्तनापूर्वी किंवा नंतर मदतीसाठीं केव्हांहि ताट फिरविलें जात नाहीं. देशांतील भागांतून माझे भक्त मला पत्रें लिहून आमंत्रण देतात. मी त्यांचेकडे जाऊन राहतों व कीर्तनें करितों. आणि ग्रंथलेखनादि करितों. माझे कुटुंबांतील कोणी मंडळी नसून एकटाच आहें आणि माझ्या गरजा फार थोड्या आहेत. इतरांप्रमाणें बाबांक मला पैसा मिळत नसे. ज्यांना रोज बाबांकडून कांहीं रकम मिळत असे त्या उत्पन्नाचा करही लागू झाला. लोकमान्य टिळक शिरडीस आल्यावर [ १९१५-१९ इनकमटॅक्स खात्याची नजर शिरडी संस्थानाकडे वळली. त्या खात्यांतील एक ऑ शिरडीस आला आणि रोज उत्पन्न किती येतें तें पाहूं लागला. प्रथम साईबा कर बसवावा असें त्यांचे मनांत होतें, पण बाबांपाशीं शिल्लक कांहींच रहात हें पाहून बाबा ज्याना रोज रुपये देत असत त्या म्हणजे तात्या पाटील, बडे बागीया व बयाजी पाटील इत्यादि लोकांवर हा कर बसला. मला व भक्त म्हा याना पैसा व त्याविषयींची काळजी यांपासून त्रास पोचूं नये म्हणून बाबांनीं दक्षता ठेविली. बाबांनीं धनाहून अत्यंत श्रेष्ठ असा माझा अध्यात्मिक फायद दिला आहे. त्यांनीं माझ्याठायीं श्रद्धा उत्पन्न केली आणि ती अनेक त दृढ केली. त्यांनीं मला महत्वाचे धडे शिकविले आणि सुंदर अनुभव प्राप्त करून

एकदां मी शिवरात्रीस शिरडीस होतों तेव्हां तेथून ३ मैल असलेल्या गोद गंगेंत जाऊन स्नान करावें असें माझे मनांत आलें. मेघाभक्तहि याच ठिकाण बाबांना अभिषेक करणेसाठीं गंगा आणीत असे. पण बाबा मला तेथें जाऊं देई ते म्हणाले, गंगा येथें माझे चरणापाशीं आहे, तूं जाऊं नको. माझें मन थो उद्विग्न झालें. साईबाबा हे ईश्वर-नारायण आहेत, आणि नारायणाच्या चरणाप गंगा वाहते ही उपपत्ति मला माहीत होती. पण प्रत्यक्ष गंगास्नानापासून जें सुख होईल तें या उपपत्तीपासून मिळेल असें माझ्या अश्रद्धाळू मनास वाटेना. बा माझें मन जाणलें. ते म्हणाले कीं, आपल्या पायापाशीं ये आणि ओंजळ पुढें मी तसें करतांच बाबाच्या दोन्ही चरणापासून पाणी वाहूं लागलें. तें घामासा कांहीं बिंदू नव्हते, तर तें सावकाश, संतत लहान धारेनें येऊं लागलें. थोड्या मिनिटांत माझी ओंजळ भरली. ती प्रत्यक्ष गंगा पाहून मला फार आनंद झा ती माझ्या मस्तकावर प्रोक्षण करून मी माझें स्नान-गंगास्नान आटपून घेतलें. मी पाणी प्यालों नाहीं. बाबांच्या आरतीच्या वेळींहि मी तीर्थ प्राशन करीत न एकदां याबाबत जोगांनीं बाबाकडे तक्रार केली. तेव्हां बाबा म्हणाले, मी त्या समजुतीप्रमाणें व सांप्रदायाप्रमाणें वागावें आणि जोगांनीं याविषयीं मला कांहीं

नाना जुन्या चालीरीतींना, विशेषत: कांहीं बाबतींत नेहमीं मान देत नसत. जुन्या रीतीरिवाजाप्रमाणें मी कोणत्याहि रूपांत कांदा खात नाहीं. पण बाबांना कांदा आवडत असे आणि कांद्याशिवाय ते क्वचित जेवीत असत. एकदां त्यांनी मला कांद्याचें पिठलें करण्यास आणि त्यांतलें थोडें मी खावें व थोडें आपणास द्यावें असें सांगितलें. मी तें तयार करून बाबांपाशीं नेलें. मी तें घरीं खाल्लें काय असें त्यांनी मला विचारतां होय असें मी उत्तर दिलें. पण खरोखर घरीं मी असें केलें कीं, त्या पिठल्याला माझ्या बोटाच्या अग्रानें स्पर्श केला आणि नंतर त्यानें हनुवटीला स्पर्श केला आणि तेथून खालच्या ओंठापर्यंत एक रेषा काढिली आणि अशा रीतीनें पिठलें खाल्लें म्हणून नंतर हात व तोंड धुतलें. मी काय खुबी केली हें बाबांनी जाणलें. (आणि त्यांना अवगत नाहीं असें काय आहे !) आणि मी काय खुबी केली हें त्यांनी लोकांस दाखविलें. ते म्हणाले 'हा खाल्ल्याचें नुसतें सोंग (बहाणा करतो, पण खरोखर नुसतें पिठल्याला बोट लावून तें हनुवटीस लावतो' असें म्हणून मी काय प्रकार केला तो त्यांनीं हुबेहुब करून दाखविला. नंतर मी खरोखर कांदा खावा असें त्यांनीं मला सांगितलें. जुन्या चालीरीतींना कांदा पसंत नसला तरी **कांदा नित्य भोजनाच्या वस्तूंत असावा** असें त्यांचें मत होतें. कांद्याला दुर्गंध येतो आणि तो कामोत्तेजक आहे म्हणून जुन्या रीतीप्रमाणें कांदा निषिद्ध मानतात पण बाबा असें म्हणत कीं, 'पचविण्याचा जोम व्हावा, त्यानें कांदा खुशाल खावा' (श्रीसाईसच्चरित अ० २३--१८) म्हणून शिरडीस असतांना बाबांच्या हयातींत एकादशी खेरीज करून मी कांदा सेवन करीत असे.

बाबा कधींकधीं पंढरपुरसारख्या क्षेत्रीं जाण्याचे कार्यक्रम पार पडूं देत नसत. भाद्रपद व अश्विन महिन्यांत विशेषत अश्विन एकादशीस पंढरपुरास जाण्यास मी फार उत्सुक असे. १९१६ सालीं नानासाहेब चांदोरकर मला मनमाडास भेटले. भाद्रपद महिना लागणार होता तेव्हां मी पंढरपुरास जाणार असें मी त्यांना सांगितलें. पण त्यांनीं मला शिरडीस नेलें. तेथें बाबांनी मला एक आठवडा, नामसप्ताह व कीर्तन करणेस लाविलें. नानासाहेबांच्या सांगण्यावरून शिरडी संस्थानांत त्यांचेकडून उत्तम पोषाख मागून घेऊन व तो अंगावर घालून मी कीर्तन करीत असे. पण वर सांगितल्याप्रमाणें बाबांनी माझा नवरदेवाचा पोषाख ताबडतोब उतरविला आणि नारदीय पद्धतीनें कीर्तन करणेस आज्ञा केली. त्याप्रमाणें मी कीर्तन करीत एक महिना शिरडींत राहिलों. भाद्रपद महिना संपला आणि अश्विन डोकावूं लागला. अश्विनांतहि पंढरपुरास जातां येणार नाहीं (नानासाहेबांच्या मनांत मला शिरडीस अश्विनांत ठेवून घेण्याचें होतें) म्हणून मी थोडास

उद्विग्न झालों. आणि मनांत म्हणालों–बाबा सद्‌गुरू हे, माझ्या देवास (पंढरपूरास) जाण्याचा मार्ग बंद करितात कसा ? बाबांनीं माझ्या मनांत काय होतें तें जाणलें आणि मला पंढरपुरास जाण्यास आणि नानासाहेबाना मला न अडविण्यास सांगितलें. त्याप्रमाणे मी मोठ्या आनंदानें पंढरपुरास गेलों.

माझ्या अध्यात्मिक प्रार्थना बाबांनीं पुऱ्या केल्या नाहींत. नामदेव व इतर संत यांचेप्रमाणें मलाहि माझ्या इष्ट देवतेचा साक्षात्कार व्हावा म्हणून मी बाबांकडे पुष्कळदां जाऊन प्रार्थना केली. प्रत्येक खेपेस, ' जरा थांब, - सबूर ' असें बाबा उत्तर देत. शेवटीं, १९१६ च्या सुमारास मी बाबांना विचारलें-बाबा, माझी विनंति सफल न करिता तुम्हीं ती नेहमी पुढें ढकलीत आहां, मला तुम्ही केव्हां साक्षात्कार करून देणार ? त्यावर ते म्हणाले **' तूं मला पाहतोस, हाच साक्षात्कार होय. मी परमेश्वर आहे.'** आपलें उत्तर असें येणार अशी माझी अपेक्षा होती पण यानें माझें समाधान झालें नाहीं असें मीं सांगितलें. माझ्या नशिबांत हा साक्षात्काराचा योग नाहीं आणि संतांनाहि नशीब फिरवितां येत नाहीं असें मानून मी माझें समाधान करून घेतलें.

**विरक्त ब्रम्हचारी**—बाबांनीं समाधि घेतल्यानंतर मी कांहीं संतांचें दर्शन घेत आहे, पण त्यापैकीं कोणांकडूनही माझें समाधान झालें नाहीं. त्यांतल्या त्यांत एका अपूर्व व्यक्तीचा माझेवर चांगला परिणाम झाला. नांदेडजवळ १९१९ च्या सुमारास एका खडकावर एक विरक्त ब्रम्हचारी राहत होता. तो अपरिग्रही असून कोणाची पर्वा करीत नसे. मला दर्शन देण्याचें त्यानें २–३ खेपा टाळलें. पण पाठविलेल्या अन्नाचा मात्र स्वीकार केला. तेव्हां मी पुनः त्याचेकडे गेलों आणि दर्शन घेऊन नमस्कार कां करूं देत नाहीं असें विचारलें.

तो म्हणाला—तुम्ही स्वतःला कीर्तनकार म्हणवितां, पण तुम्हीं अहंकार सोडला आहे काय ?

मी—मला तो कसा सोडतां येईल. प्रत्येकाला अहंकार असतोच.

तो—अन्न पाठवितांना मी हें अन्न पाठवीत आहे असा अहंकार तुम्हाला वाटला नाहीं काय ?

मी—अहंकार, सात्त्विक, राजस व तामस असा तीन प्रकारचा असतो; वाईट (तामस) अहंकाराचा त्याग केला पाहिजे. माझें हें विधान त्याना पसंत

नव्हतें माझा अहंकार समूळ नाहींसा करावा असें त्याचें मत दिसलें. त्यानें माझे मनांतील सर्व कांहीं जाणलें आणि आपल्या सामर्थ्याची कांहीं उदाहरणें दिलीं.

तो—तुम्हीं संतचरित्रें लिहीत आहांना ?

मी—होय.

नंतर, त्यांनीं, मी सहा दिवसांपूर्वी रचिलेलीं पदें ( अद्याप प्रकाशित झालेली नव्हतीं ) म्हणून दाखविलीं. त्याचें हें अंतर्यामित्व पाहून मी चकित झालों. पुनः.

तो—सांईबाबांच्या चरणापासून तुम्हाला गंगा मिळाली कीं नाहीं ?

मी—होय, मिळाली.

तो—तुम्हीं त्याचें काय केलें ?

मी—त्याचें मस्तकावर मार्जन करून घेतलें.

तो—आणि तुम्ही तें प्राशन केलें नाहीं; कारण आपण ब्राह्मण आहों आणि तें प्याल्यानें भ्रष्ट होऊं असें तुम्हांला वाटलें, काय तुमचा अहंकार पहा ?

यानंतर मी त्यांचेकडे रोज रात्रौ जाऊं लागलों. आणि कांहीं तास त्यांचे बरोबर घालवूं लागलो. या विषयी गावांत बरी वाईट चर्चा सुरू झाली. गावांतील एक अश्रद्ध टवाळखोर गृहस्थ माझेबरोबर त्यांचेपाशीं आला. त्यांचेशी त्याची बरींच प्रश्नोत्तरें झालीं. त्यांत त्यांनीं त्या टवाळखोर गृहस्थाची सर्व अनैतिक बिंगें बाहेर पाडलीं आणि त्यांची खात्री पटवून दिली. यानंतर गावांत त्याची बरीच प्रसिद्धी झाली. तें त्यांना न आवडून त्यांनीं तेथून लवकर कायमचा पोबारा केला.

## सांईबाबाविषयीं लिहिलेले ग्रंथ येणें प्रमाणें—

(१) **संतकथामृत**—मी नोकरींत असतां बाबा व इतर संत याविषयीं हा ग्रंथ क्रमशः लिहून १९०३ सालीं प्रसिद्ध केला. बाबांनीं या माझ्या प्रयत्नाला आशिर्वाद दिला. यांतील कांहीं भाग बाबांना वाचून दाखविणेंत आला नाहीं किंवा याबंबधीं माहिती देण्यासाठीं बाबांना विचारलें नाहीं. त्यांनीं बोलतांना जें कांहीं सांगितलें ते मी टिपून ठेविलें. 'सेलु' विषयीं बाबांनीं जें कांहीं सांगितलें होतें. त्याविषयीं सेलु गांवीं जाऊन मीं चौकशी केली. प्रत्येक भाग बाबाचे हातीं देतांच 'ठीक आहे' असें बाबा म्हणाले. बाबांना लिहितां वाचतां किंवा सही करितां येत होतें कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. (२) नंतर **भक्तिलीलामृत** हा ग्रंथ बाबाच्या हयातींत १९०६ सालीं प्रसिद्ध झाला. (३) शेवटीं **भक्तिसारामृत** तयार

झाला. यातील ५२–५३ अध्याय [बाबाविषयींचे] बाबांच्या हातीं देतांच 'ठीक आहे' असें ते म्हणाले. इतर अध्याय सवडीनुसार १९१८ च्या पुढें तयार होऊन सबंध ग्रंथ १९२५ सालीं प्रसिद्ध झाला.

अध्याय २८ यांत बाबाविषयीं जी माहिती आहे ती कांहीं अंशीं बाबांच्या सांगण्यावरून आणि कांहीं अंशीं सेलूच्या खेडुतांच्या सांगण्यावरून दिलेली आहे. आपण सेलूहून आलों एवढेंच बाबांनीं सांगितलें. त्यावरून मी सेलू गांवी गेलों आणि तेथें चौकशी केली. ३५ वर्षांपूर्वी ही चौकशी केलेली असल्यामुळें कोणी खेडुताने काय सांगितलें हें नक्की सांगतां येत नाहीं. त्यांनीं असें सांगितलें कीं, एक म्हातारा साधु होता व तो एका तरुण फकिराला शिक्षण देऊन तयार करीत होता कांहीं लोक त्या साधुवर चिडून त्यांनीं त्याला दगड मारून ठार केलें, पण तो तरुण फकीर पळून गेल्यामुळें बचावला. हें वर्तमान अजमासे १०० वर्षांपूर्वी घडलें. साईबाबांनीं नानासाहेब चांदोरकरांसमक्ष मला असें सांगितलें कीं, जी वीट आपण उशासारखी वापरीत होतों (आणि जी बाबांचें स्मारक म्हणून संस्थानांत जतन करून ठेविली आहे) ती आपल्या वेंकुशाहा गुरूनें आपणांस दिलेली होती चांदोरकरांना हें सांगितलें म्हणून ग्रंथांत मी लिहिलेलें आहे, तें माझें नांव वरचेवर ग्रंथांत प्रमुखपणें येऊं नये एवढ्याचसाठीं होय. ५३ व्या अध्यायांत चांदोरकरां-विषयीं जें लिहिलेलें आहे तें त्यांनीं मला सांगितलें नाहीं. त्यांना आलेल्या अनुभवाची डायरी किंवा नोंद त्यांनी ठेविली होती कीं नाही हें मला माहीत नाहीं.

**रतनजीची कथा**—नांदेडला रतनजी शापूरजी वाडिया नांवाचे एक मिल-कॉंट्रॅक्टर होते. ते एकदां शिरडीस साईबाबांच्या दर्शनास आले. बाबा त्यांना म्हणाले कीं, तूं पूर्वीं दिलेली दक्षिणा रु. ३–१२–० मला पोंचली आहे, आणि आतां तुला द्यावयाची ती दे. दक्षिणा देऊन उदीचा प्रसाद व आशीर्वाद घेऊन रतनजी परत नांदेडास आले. आपण पूर्वी बाबांच्या दर्शनास कधीं गेलों नाहीं आणि पूर्वीची दक्षिणा (रु. ३–१२–०) मला पोंचली असें बाबा कसें सांगतात याचें त्याला आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं याबाबत दासगणूला खुलासा विचारला. तेव्हां विचार करतां-करतां दासगणूला एक मागील प्रसंग आठवला. रतनजी शेटजींनीं मौलीसाहेब नांवा-च्या एका पीराचें, फलपान (बदाम, पिस्ते वगैरे) सुमनहार देऊन स्वागत केलें होतें त्यासंबंधीं जमाखर्च काढून पहातां त्याकामीं रु. ३-१२-० इतकाच खर्च झाला होता हें पाहून रतनजी शेटजीस व इतरांना आश्चर्य वाटलें. (याविषयीं सवि-स्तर कथा श्रीसाईसच्चरित अध्याय १४ यांत पहावी.)

साईबाबांच्या गुरूची समाधि ( निंब वृक्षाखालची ) आम्हीं प्रथम पाहिली तेव्हां ती दिसण्याजोगी नव्हती. ती जमिनीच्या खालीं होती. साठेसाहेबानीं पायऱ्या व पार बांधला व गुरूच्या पूजेसाठीं कोनाड्याची व्यवस्था केली.

**वामन शास्त्री इसलामपुरकर**—प्रथम मी जेव्हां नानासाहेब चांदोरकर यांचेबरोबर बाबांच्या दर्शनास गेलों, तेव्हां बाबाविषयीं मला आदर होता किंवा त्यांना भेटावें अशा हेतुनें गेलों नाहीं, नानासाहेबाची मर्जी संपादन करावी हाच त्यांत माझा हेतु होता. या नंतर एक वर्षानें निजाम स्टेटपैकीं **ओसमानबाद** जवळ इसलामपूर गांवच्या वामन शास्त्री नांवाच्या एका गृहस्थाची भेट झाली. ते मद्रास विश्वविद्यालयाचे ग्रॅजुएट असून फार धार्मिक व ब्रह्मनिष्ट होते. माझ्या वरिष्ठाच्या आज्ञेप्रमाणे **खायगोंडा** येथें मला त्यांची व्यवस्था पहावी लागली. त्यांची योग्यता पाहून त्यांनीं गुरू नात्यानें मोक्ष प्राप्त्यर्थ मला मंत्रोपदेश द्यावा अशी मी त्यांना विनंति केली. त्यांनीं ती मान्य करून मी त्यावेळीं कट्टा शिवभक्त असल्यामुळें मला शिवमंत्र दिला आणि त्याचा जप करणेस सांगितलें. मी त्यांना साईबाबाविषयीं विचारलें, त्यांनीं सांगितलें कीं, शिरडीस आपण तीन दिवस बाबाबरोबर राहिलों होतों. बाबा हे मोठे संत व रामभक्त आहेत, लोकांना अद्याप त्यांची योग्यता कळली नाहीं, पुढें कळेल इत्यादि. यामुळें माझा बाबाविषयीं आदर वाढला आणि अधिक श्रद्धेनें मी शिरडीस जाऊं लागलों.

मंत्रोपदेश दिल्यानंतर दोन वर्षांनीं वामन शास्त्र्यांनीं मला भुसावळला बोलाविलें आणि काशीस जाऊन सहा महिन्यानंतर ज्येष्ठ व. एकादशीला समाधि घेणार असें सांगितलें मी त्यांचें उत्तरकार्य करावें असा त्यांचा हेतू होता मी घरी परतल्यावर त्यांनीं पांचशें रुपयेच्या नोटा व आपलें मृत्युपत्र इनशुअर्डपोष्ट पाठविलेले मिळालें. गुरूनें ठरलेल्या दिवशीं समाधि घेतल्याची तार मला आली, तेव्हां आणि त्यानंतर मी त्यांची पुण्यतिथि साजरी करीत आहें. बाबांना मी हें कळविलें आणि त्यांना तें पसंत पडलें.

**बाबा व कट्टर मुसलमान** बाबाचीं कृत्यें व मतें शिरडीच्या मुसलमानाशीं जुळतीं नसलेमुळें त्यांचा बाबाशीं केव्हां केव्हां बेबनाव होत असे. बडे बाबा व इतर मुसलमान यानी कुतब्याच्या प्रार्थनेसाठीं बाबांस गांवाबाहेर बोलाविलें होतें. बाबानें प्रथम कबूल केलें पण ती मंडळी बाबाना बाहेर नेण्यास आली, तेव्हां बाबांनीं नकार दिला.

(दुसऱ्या खेपेस ती मंडळी येऊन मशिदींत प्रार्थना म्हणूं लागली, पण बाबा त्यांच्या सांप्रदायिक प्रार्थनेंत सामील झाले नाहींत. एकदां मोहरमाच्या सणांत कांहीं त्यांनीं मुसलमानांनीं मशिदींत ताजिया ( ताबूत ) आणतों म्हणून सांगितलें, एक ताबूत करून मोहरमच्या पांचव्या दिवशीं त्यांनीं तो मशिदींत ठेविला. बाबांनीं तो एक दोन दिवस तेथें राहूं दिला. नंतर तो त्यांनीं ओढून अग्निवर ठेवून या मशिदींत मला प्रेत नको असें म्हणून जाळून टाकिला.) समर्थ बाबाविरुद्ध ते कांहीं करूं शकले नाहींत. एका कट्टर मुसलमानानें एकतरा विशिष्ट तऱ्हेची फुलांची माळ आणली व मशिदींतील कमानींत घालण्याची परवानगी मागितली. बाबानें सांगितलें कीं ती घेऊन जा आणि हनुमानमूर्तीवर घाल. मी मुसलमान असल्यामुळें हिंदूंच्या मूर्तीवर घालीत नाहीं असें त्यानें उत्तर दिलें. बाबानें त्याला खूप रागें भरून हनुमान व अल्ला एकच आहेत असें सांगितल्यावर तो ती माळ घेऊन गेला.

**हनुमानाविषयीं बाबांचा आदर**—चावडीच्या एका वरील भागांत ओट्यांत कोपऱ्यांत हनुमानाची एक लहानशी मूर्ति होती. बाबा खालच्या भागांत सतत असत. तेथें एकदां पावसाचे थेंब पडूं लागले तेव्हां वर जाऊन ओट्यावर बसणेस कोणी एकानें बाबास सांगितलें. **'देवाबरोबर आम्ही कसें बसावें?'** असें म्हणून बाबानें तें नाकारलें.

फकीर बाबा उर्फ बडे बाबा, यांनी एकदां एक हिंदु नुकताच मुसलमान धर्मांत बाटलेला असा मशिदींत आणला. **'तूं आपला बाप बदललेला आहेस'** असें म्हणून बाबानीं त्याच्या एक थोबाडींत दिली.

कांहीं विशिष्ट अवस्थांमध्यें बाबा अल्ला व तसेंच देवता या विषयीं अशिष्ट ( अनुदार ) उद्गार काढीत असत. पंढरपुरास जाण्याची कोणी परवानगी मागितली तर कांहीं शिव्याशाप देऊन बाबा ' जा ' म्हणून सांगत. पण ज्ञानदेव किंवा तुकाराम यांची आरति चालली म्हणजे अदबीनें ते हात जोडून बसत असत.

अद्वैताबद्दल बाबांचे मत काय होतें हें सांगणें कठीण आहे, प्रत्यक्ष ते याबद्दल बोलत नसत. चुकून केव्हांतरी तसा ( अद्वैत ) ध्वनि ते काढीत असत. " अहं ब्रह्मास्मि, सर्वं खल्विदं ब्रह्म " ( मी परमेश्वर आहें परमेश्वर सर्वांत आहे ) असें ते म्हणत. ते प्रत्यक्ष किंवा साक्षात अद्वैत (एकमेवाद्वितीयं) होते. कांहीही होवो ते आपले स्वस्थ (निर्विकार) असत. बत्तीस नर्तिका रोज त्यांचे समोर नर्तन गायन करीत असत, पण बाबा त्यांचेकडे ढुंकूनही पाहत नसत. ते नेहमीं पूर्ण विरक्त व स्वात्मानंदांत मग्न असत.

एकदां एका भक्तानें विचारलें 'बाबा ब्रह्म (परमात्मा) काय आहे ? बाबानें कांहीं उत्तर दिलें नाहीं, पण बागचंद मारवाड्याकडून शंभर रुपये आणण्यास एकाला पाठविलें. त्यानें शंभर रुपये न पाठवितां बाबाला आपला नमस्कार पाठविला. दुसऱ्या एका इसमाकडे शंभर रुपयासाठीं पुनः एक इसम पाठविणेंत आला, पण तेथेंहि नकारच मिळाला. नंतर बाबानीं नानासाहेब चांदोकराना बोलाविलें आणि त्यांच्रेपाशीं शंभर रुपये मागितलें. नानासाहेबांनीं त्या बागचंद मारवाड्याला चिठी लिहिली तोच त्यानें लगेच शंभर रुपये पाठविले. बाबा यावर एवढेंच बोललें कीं, 'या जगांत सर्व व्यवहार असा चालतो' नंतर त्या प्रश्न करणाऱ्यानें मला खासगी बैठकींत बाबानें आपल्या प्रश्नाचें उत्तर कां दिलें नाहीं असें विचारलें. मी सांगितलें कीं शंभर रुपये (दक्षिणा) याचना आणि त्यावर मिळालेलीं उत्तरें हेंच तुझ्या प्रश्नाचें उत्तर होय. दुसऱ्यांनीं पैशाची याचना केली, तो आला नाहीं, पण नानासाहेबांनीं मागतांच लगेच तो आला तसें ब्रह्म नुसतें जाणण्याची इच्छा करणाऱ्याला तें मिळत नाहीं. अधिकार संपन्नालाच तें मिळतें. ब्रह्माची अपेक्षा करण्याच्या आधीं तुम्हीं लायक व्हा.

केव्हां केव्हां बाबा दुपारी १ ते २ च्या दरम्यान एकटेच असतांना पडद्यामागें कांहीं विचित्र क्रिया करीत असत. एका पिशवींतुन पैसा, ढबु पैसा, आणेली, चवली, पावली, अधेली व रुपया अशीं नाणीं काढून आपल्या बोटांच्या अग्रानीं तीं सावकाश घासीत असत. त्यावेळीं मंत्र म्हणत असत किंवा नाहीं हें माहित नाहीं. तीं नाणीं घर्षणामुळें साफ व गुळगुळीत झाली होती. घांसत असतां हें नानाचे, हे बापूचें हें काकाचे असे तें म्हणत असत. कोणी जवळ असल्यास, ती नाणीं गोळा करून पिशवींत घालून लपवून ठेवीत असत.

बाबा हजारों गोष्टी सांगत असत. त्यापैकीं कांहीं थोड्या सांगतों. एकदां बाबा म्हणाले—मी पुणतांब्यास असतांना दोन पक्षांमध्यें भांडण झालें. कां झालें यांचे मला आश्चर्य वाटलें. जवळच एक नाण्यानें भरलेलें भांडें होतें. त्यामुळें भांडण जुंपलें असावें. मी सावकाश तेथें गेलों आणि ते भांडें लांबविलें. आपलें धन गेलें असें म्हणून ते शोक करूं लागले. मी मनांत म्हणू लागलों-मी कोण? हें धन काय आहे व कोणाचें आहे? या करितां काय हा घोंटाळा व काय हें भांडण? तें भांडें माझें व मी त्या भांड्याचा.

बाबा एकदां असें बोलले—आपणाला पुत्र (मी) झालों म्हणून माझी आई फार आनंदांत होती. तिच्या ह्या वर्तनाबद्दल मी आश्चर्य करीत होतो? तिला मी केव्हां झालों ? मी जन्मलों तरी काय? मी प्रथम पासून अस्तित्वांत नव्हतों काय ? या पदरी ती आनंदात कां आहे ?

एकदां शिरडीस कोणी एकानें शिरा तयार केला होता. मला तो शिरा दिला की नाही असें बाबांनीं विचारतांना त्या व्यक्तीचें व माझें बरें नाहीं म्हणून मला शिरा मिळाला नाही असें मी सांगितलें. त्यावर बाबानें असा उपदेश केला कीं—कोण कोणाला व काय देतो ? हा शिरा काय आहे? तो कोण खातो? कोणी आपला वैरी आहे असें म्हणूं नको. कोण कोणाचा वैरी आहे? कोणाविषयींही मनांत वाईट भाव बाळगूं नको. सर्वजण एकच व सम आहेत. हा उपदेश ( विचार ) माझ्या अमृतानुभवावरील दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं दिलेला आहे.

मी ज्ञानेश्वराच्या अमृतानुभवावर ओंवीबद्ध टीका लिहिणार होतों. सातारचे दादा महाराजांनी सांगितलें कीं, ग्रंथ फार कठीण आहे. आमचे जवळ राहून समजून घ्या आणि नंतर टीका लिहा. मी म्हणालों कीं—'मी टीका लिहावी अशी बाबांची इच्छा असेल तर तेच मला बुद्धियोग देतील, दुसऱ्यांजवळ मी शिकावयास जाणार नाहीं." दादामहाराजांस हें माझें म्हणणें पटलें नाहीं. पुढें टीका तयार झाल्यावर ती दादामहाराजांनीं पाहिली व ती पाहून दादा महाराज सद्गदित झाले व म्हणाले कीं, बाबा खरे समर्थ आहेत, त्यांची तुमचेवर कृपा आहे म्हणूनच अशी टीका तुमचे हातून तयार झाली. तुम्हाला दुसऱ्याच्या मेहनतीची जरूरी नाहीं.

तसेंच दासगणू 'इशावास्य उपनिषदावर भावार्थ' बोधिनी टीका लिहीत असतांना कांहीं प्रमुख मंत्राच्या अर्थाविषयीं त्यांना शंका उत्पन्न झाली होती, त्या शंकेचें निवारण बाबानीं कांकासाहेब दीक्षिताच्या तरुण मोलकरीणीकडून करविलें या विषयींची मनोरंजक व उद्बोधक कथा श्रीसांईसच्चरित अध्याय २० येथें जिज्ञासूंनी पहावी.

## 'श्रीसाईनाथार्पणमस्तु'

---

टीप—दासगणूनी आपला अनुभव बी. व्ही. नरसिंह स्वामीना मराठीतच लिहून दिला असला पाहिजे आणि सदर स्वामींनीं त्याचें इंग्रजींत भाषांतर करून 'भक्तांचे अनुभव' या इंग्रजी पुस्तकांत त्यांनी तो प्रसिद्ध केला. मूळ ( मराठी ) अनुभव कथन मिळाल्यास फार उत्तम होईल असें वाटून सदर स्वामींनीं तो पाठवून द्यावा अशी मी पत्रद्वारें विनंती केली. पण त्यांचेकडून अद्याप तो न आल्यामुळें दुधाची तहान ताकावर भागविणें भाग पडलें याबद्दल वाचकांनी क्षमा करावी. ७।३।४२ ना. बा. गुणाजी

॥ श्रीशंकर ॥

# श्री रामनवमी शके १८६४

# उत्सव अहवाल

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत चुडामणी श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी तालुका कोपरगांव जिल्हा अहमदनगर यांच्या शके १८६४ च्या श्रीरामनवमीच्या उत्सवाचें इतिवृत्त.

सदरचे उत्सवास चैत्रशुद्ध अष्टमी शके १८६४ ता. २९|३|४२ रोजीं आरंभ होऊन चैत्र शुद्ध द्वादशी रोजीं काला होऊन उत्सव समाप्त झाला. या उत्सवास नांदेड, उमरी, गोरटे, मुखेड, अतनूर, पाथरी, पेठशिवणी, कोलंबी, कोकलेगांव, अंधेरी, मुंबई, सांताक्रूज, ठाणें, पुणें, खांबगांव, सोलापूर, व मद्रासकडील बरीच मंडळी आली होती. उत्सवाचे कार्यक्रम उत्तम प्रकारें पार पडले. चोरी मारामारी वगैरे कांहीं झालें नाहीं. पोलीस बंदोबस्त योग्य होता. पिण्याचे पाण्यांत पोट्याशिअम परमँगनेट टाकण्यांत आल्यामुळें रोगराई वगैरे कांहीं झाली नाहीं. चालू सालीं महाराजांचे समाधीस स्नान घालण्याकरितां तीनशें ते सव्वातीनशेंपर्यंत गंगेच्या कावडी आल्या. यांत सर्व जातींचे लोक सामील होते. चालू साली उत्सवांत पांच दिवसांत मिळून चार ते पांच हजार पान झालें. उत्सवांत जिलबी गूळशिरा व बुंदीचे लाडू अशीं तीन पक्वान्नें केलीं होतीं. चालू सालीं यात्रेकरितां दीडशें एक दुकानें आली होती. त्यांत हलवाई, स्टेशनरी, कासार, सोडावॉटर, हॉटेलें, पानवाले, फळवाले वगैरेचीं दुकानें होतीं. हीं दुकानें अष्टमीला रात्रीं आली व नवमी दशमीला राहून कांहीं एकादशीला व कांहीं द्वादशीला गेली.

दशमीचे दिवशी कुस्त्यांचा हगामा मोठ्या प्रमाणांत झाला. पण गांवांत दुफळी असल्यामुळें हगाम्यास सालोसाल कमीपणा येत चालला आहे. विना-कारण संशयाचीं ढोंगें माजून पुढारी मनुष्यावर शिंतोडें उडत आहेत. तेव्हां

पास पुढील सालापासून असें करावें कीं, श्रीसाई महाराजांचे पेटींत पांच दिवसांत जो पैसा येतो तो हगाम्याचे कामी गावांतील पंचांचें स्वाधीन करावा व पंचाची योजना अशी असावी कीं, कोते, शेळके, गोंदकर, शिंदे या चार कुंडांतून चार संभावीत माणसें व देवस्थान कमेटीतर्फे एक अशी पांच माणसें निवडून त्यांचे स्वाधीन पारितोषक देण्याचा पैसा अगर कपडा जे संस्थानचे सोईस येईल त्या सोईप्रमाणें देण्याचें करावे. आजपर्यंत हगाम्याची व्यवस्था श्री. तात्या गणपतराव पाटील कोते हे उत्तम प्रकारें करीत आले पण हे गृहस्थ कमेटीचें विश्वस्त असल्यामुळें त्याना पैशाचा संबंध ठेवतां येत नसल्यामुळें ही वरील योजना कमेटीनें अमलांत आणून हगामा उत्तरोत्तर भरभराटीस येईल असे करावें. हगामा हें जत्रेचें मुख्य अंग आहे. तरी त्याला सालोसाल कमीपणा येत चालला आहे हें बरें नाहीं.

उत्सवास निमंत्रण पाठवण्याचा खर्च जो होतो, तो संस्थाननें सोसावा. फक्त चिठ्या छपाईचा खर्च व प्रसाद पाठवण्याचा खर्च जो होतो, तो उत्सवाच्या जमा झालेल्या रकमेंतून व्हावा. प्रसाद सर्वांस पाठवण्याचें मुळींच कारण नाहीं ज्याचे पैसे मनिऑर्डरने आले असतील त्यांना प्रसाद पाठवणें अवश्य आहे. जे लोक समक्ष येथें येतात त्याना प्रसाद पाठवण्याचें कारण नाहीं कारण त्यांना येथें नारळाचा प्रसाद दिला जातो. आतां निमंत्रण पाठवण्याचा खर्च संस्थानने सोसावा. तो एवढ्याच करितां कीं, सालांतून एकवेळ संस्थाननें साई भक्तांस निमंत्रण पाठविणें योग्य होईल. पण त्याचा सर्वस्वी बोजा उत्सवावर घालूं नये. फार झालें तर झालेल्या खर्चाची निम्मी रक्कम उत्सवाच्या खर्चांतून घ्यावी. या माझ्या विनंतीचा संस्थान कमिटीनें विचार करावा. कारण तिन्ही उत्सवाला मिळून जर निमंत्रण पत्रिका पाठवणें व प्रसाद पाठविण्याची प्रथा सुरू असेल तर तिन्ही उत्सवाला नऊशें रु. दरसाल खर्च येईल शिवाय इतकेंही करून जितक्या लोकांना आमंत्रण जातें तितके लोक

घेतात असें नाहीं, त्यांचें येण्याचें प्रमाण फार तर शेंकडा पंचवीस पडेल, म्हणून माझ्या या लिहिण्याकडे संस्थान कमेटीने लक्ष देवून काय ठरविणें असेल तें ठरवावें.

उत्सवास तालुक्याचे अधिकारी मेहेरबान खानसाहेब व जिल्हा अधिपती कलेक्टर साहेब बहादूर हे भेट देऊन गेले. उत्सवांत ज्यांनीं त्यांनीं आपलीं कामें योग्य बजाविल्यामुळें कोणत्याही प्रकारची अनास्था झाली नाहीं. तरी या उत्सवांत ज्यांनीं येथें येवून प्रत्यक्ष भाग घेतला किंवा द्रव्यद्वारे मदत केली त्या सर्व लोकांचे व त्यांच्या मानमरातबाचें व लेकरां बाळांचें आरोग्याचें संरक्षण श्रीसाईबाबा करोत अशी त्यांच्या पवित्र चरणापाशीं विनंती करतो. उत्सवाचा तपशीलवार खर्डा पोटीं आहे. त्यांत नजर चुकीनें गैरसमजानें अगर जाणूनबुजून कांहीं चुका झाल्या असतील त्याची श्री सद्गुरु साईबाबा महाराजांनीं क्षमा करावी व अशीच सालोसाल सेवा दासाच्या हातून घेत जावी, एवढी श्रीसाईचरणीं प्रार्थना करून हा लेख पुरा करतों.

**जमा**

७६६-११-९ दासगणू मार्फत
५२८--१--६ संस्थान मार्फत
१०२--६--६ पेट्या समाधी मंदीर व द्वारकामाई
________
१३९७-३-९

२६-४-० दासगणू मार्फत तूर्त भरलेली
________
१४२३--७--९

**खर्च**

१०४१-०--० दासगणू मार्फत
२८०-१--३ संस्थान मार्फत
१०२-६--६ श्री तात्या गणपत पाटील कोते मार्फत
________
१४२३-७--९

सकल संतांचा चरणरज,

**दासगणू.**

# संस्थान भोजनगृह योजनेचा भक्तांचे माहितीकरितां खुलासा.

## संस्थानांत स्वयंपाकाची व्यवस्था सुरू केलेमुळें झालेल्या सोई:—

**१ नित्य अन्नदान—**

बाबांचा रोजचा दोन्ही वेळचा नैवेद्य व भक्तांकडून वार्षिक देणगी दाखल यणारे तांदुळांतून ४-५ मुदा व शिवाय भक्तांनी कळविलेप्रमाणें निरनिराळे नैवेद्य तयार होऊन ते नैवेद्य आरती नंतर गोरगरीब व सेवेकरी ( अबदुल, लाला, दस्तगीर, भंगी व इतर याचक ) यांस देणेंत येतात. शिवाय रोज आरती नंतर ४।५ याचकांस [ बुध्या, चिमी, आबा महार, भंगीण वगैरे ] यांस भोजन गृहांतून जेवण वाढून देणेंत येतें. त्याचप्रमाणें आले गेले भक्तांपैकीं गरीब भक्तांस एकदां मोफत जेवण देणेंत येतें. कांहीं सन्माननीय पाहुणे मंडळीचे आदरातिथ्य म्हणून भोजनादि सोय विनामोल करणेंत येते. कोरडे शिधेही आले गेले याचकांस देणेंत येतात.

या भोजनगृहांत काम करणारे मंडळींचीही भोजनाची व्यवस्था होते. मॅनेजर मात्र आपला भोजन खर्च दरमहा कोठीकडे जमा देतात. संस्थान कार्यवाहक कामानिमित्य शिरडींत आले तर त्यांची भोजनादी सर्व व्यवस्था व्हावी असें कमिटीनें ठरविलें आहे. परंतू या पैकीं कांहीं मंडळी मर्जीनुरुप या सोईचा मोफत फायदा न घेतां त्याचा मोबदला कोठीकडे जमा देतात.

वरील योजना संस्थान मार्फत आमलांत आणणेंत आलेमुळें बाबांचे द्वारीं दररोज किमान १०।१५ पात्रांचे अन्नदानाची सोय बाबानीं संस्थान मार्फत करून घेतली आहे. ही तरी एक बाबांची लीला नव्हे काय ? या कामीं ध. फ़. [अन्नदान नैवेद्य प्रसाद वगैरे करितां] भक्तांकडून येणारे देणग्यांतून खर्चाची सोय होऊन संस्थानास तोशिष बसत नाहीं.

**[२] आले गेले भक्तांची सोय—**

ज्या भक्तांची भोजनादी सोय दुसरीकडे होणेंसारखी नसते व जे कोणी आपली सोय करणेस संस्थान मॅनेजर यांस विनंती करितात त्यांची भोजन, स्नान, दिवाबत्ती वगैरेची सोय वरील संस्थान भोजनगृहा मार्फत, संस्थानने वेळोवेळीं ठरविलेले दरानें केली जाते. ही सोय येणारे भक्तांस फारच पसंत असलेचें निदर्शनास येत आहे.

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस.

ता. ३१ मार्च १९४२

5

# श्री सद्गुरू साईनाथ



श्री सच्चिदानंद सद्गुरू आधुनिक श्रीसंतचूडामणि श्री साईबाबा महाराज संस्थान शिर्डी ता. कोपरगांव जि. अहमदनगर यांचा सालाबाद प्रमाणें श्रीगुरुपौर्णिमा उत्सव आषाढ शु॥ १५ शके १८६४ सोमवार ता. २७ जुलै १९४२ रोजीं श्री क्षेत्र शिर्डी येथें महाराजांच्या मंदिरांत होणार आहे. तरी या समयीं आपण कृपाकरून आपल्या कुटुंबांतील बालगोपालांसह व मित्रमंडळीसह श्रीच्या तीर्थ प्रसादास अवश्य यावें अशी नम्र विनंती आहे.

## उत्सवाचा कार्यक्रम

| | |
|---|---|
| ता. २६ जुलै, आषाढ शु. १४ | रविवार–नियमित कार्यक्रमाव्यतिरिक्त दोनप्रहरीं कीर्तन व रात्रौ रथ. |
| ,, २७ ,, ,, ,, १५ | सोमवार–प्रातःकाळीं अभिषेक. नंतर श्रीचे समाधीस मंगलस्नान, पूजा, आरती व तीर्थ प्रसाद. सायंकाळीं कीर्तन व रात्रौ पालखीची मिरवणुक. |
| ,, २८ ,, ,, व॥ १ | मंगळवार–सकाळीं श्रीची पूजा. गोपालकाला व भोजनप्रसाद. |

शिर्डी
३७ चराई रोड ठाणे
ता. ७–७–१९४२

श्री साईबाबा शिर्डी संस्थान कमिटी मार्फत,
आपला नम्र, साई सेवक
श्री. ना. खारकर (ऑ. चिटणीस)

सूचना:—जरूरी प्रमाणें कार्यक्रमांत फेरफार करणेंत येईल.

वर्गण्या संस्थानचे खजिनदार रा. बा. घैसास (टि. जु. ट्रस्ट, बिल्डिंग नं. २ गोखले रोड, नॉर्थ, दादर) अथवा, दुय्यम खजिनदार—दा. वि. खांबारे. विलेपारले यांजकडे पाठवाव्या.व पावत्या घ्याव्या इतरत्र पाठविलेस संस्थान जबाबदार होणार नाहीं.

# ANNOUNCEMENT.

6

Shri Guru Paurnima [ Ashadha Shuddha 15] Utsava for the shake year 1864 of Shri Sadguru Sai Baba will as usual be celebrated at His shrine at Shirdi, Taluka Kopargaon, Dt. Ahmednagar, by the Shirdi Sansthan Committee. All devotees of Sai Baba are invited to attend and partake in the celebrations which will commence from Sunday the 26 th and terminate on Tuesday the 28 th of July 1942.

Contributions should be sent to either the Treasurer [ R. V. Ghaisas T. J. T. Bldg. No. 2 Ghokhale Road. North, Dadar, or the Astt. Treasurer, D. V. Sambare, Vile Parle ] of the Sansthan and receipts obtained the Sansthan will not be responsible if they are sent otherwise.

**S. N. Kharkar,**

*Hon. Secretary,*

Shri Sai Baba, Shirdi Sansthan.

P. S. Remittances by Postal orders or cheques will not be accepted. Sansthan Rule Book in English As. 3/- & Marathi Price Ans. 6 postage Extra.

If the Bhaktamandal Subscription is still not paid for the year 1940 to 42 may please be paid earliar.

# शिरडी वृत्त

## —मार्च १९४२—

या महिन्यांत मुंबई, पुणें, ठाणें, नाशीक, अहमदनगर, नांदेड, मुखेड, उमरी, मद्रास, राजमहेंद्री, औरंगाबाद, बल्लारी, सिकंदराबाद, हैदराबाद, सोलापूर, पंढरपूर, दौंड, बेंगलूर, मंगलूर, भुसावळ, चाळीसगांव, संगमनेर, निमोण, कोपरगांव, वगैरे ठिकाणाहून बरेच भक्तलोक श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन गेले.

चालू महिन्यांत श्रीचा श्रीरामनवमी उत्सव साजरा झाला त्याचा अहवाल दिला आहे.

### देणगी

माहे नोवेंबर १९४१ या महिन्यांत श्री. श्रीमतीबाई नार्वेकर मुंबई यांनी जरीकाठी बनारसी गुलाबी शेला. [ चुकीची दुरस्ती ]

श्री. बाळ मुकुंद दत्ताराम पिळगांवकर यांनीं मंदिरांत लावण्याकरितां चार हंड्या दिल्या आहेत.

श्री. सावळाराम नामदेव रासनें, घासगल्ली, अहमदनगर, दोन पोतीं तांदुळ.

श्री. बाळाजी गोविंद रासने, अहमदनगर, एक पोतें तांदुळ.

श्री. गणपत रामकृष्ण बोर्लीकर, तांबाकाटा, काळबादेवी रोड, मुंबई, अर्धे पोतें १९ पायली.

श्री. शामराव हरी सुखटणकर, खंडेरावची चाळ, खोताची वाडी, गिरगांव बॅकरोड, मुंबई, उददाणी (जर्मन सिल्व्हरची).

कु. सुमंत आरोळकर, मुंबई, तांबडी झालर. पांढरी फीत लावलेली सुती सुमारें १४ फूट लांबीची.

श्री. भास्कर सदाशीव सातंग, पो. ए. इ., मुंबई (दादर), भांपला जरीकांठी बनारसी शेला.

श्री. बापूराव राघोजी बोराबके, शिर्डी. गलेफ (हिरवा सॅटीन).

श्री. एकनाथ प्रल्हाद सुगांवकर, मरी स्वामीची चाळ, सोलापूर, रेशमी जरीकांठी रुमाल असमानी रंगाचा.

श्री. हेमराज हिंदुमल्ल, दहीवाडी. कोपरगांव, जरीकांठी सुती उपरणें पान एक.

श्री. पुनमचंद मोतीचंदलाल मारवाडी, दिंडोरी, रेशमी चिटाचा कपडा.

,, मुल्तानचंद फत्तेचंद, शिर्डी, रेशमी गुलाबी चिटाचा कपडा.

,, वझिरमलीक, शिर्डी, गलेफ हिरवा (सॅटीन तांबडी) फित.

,, गुलमहंमद पठाण, गलेफ (जांभळा) गुलाबी फीत.

,, दासगणू महाराज, पिंवळेकाठी, साधे उपरणें, पान एक.

,, राधाकिसन नारायण राहतकर, शिर्डी, पिवळेकांठी साधे उपरणें पान १

,, जमालबाई कोंडाजी मुसलमान, शिर्डी, हिरवा मद्रा, वार दोन २

,, केशव गोपाळ तळवलकर, मुसारी बजार, उमरावती, सफेत (मलमल) वार ४.

,, सी. व्ही. नागरत्नम नायगर मुदलीयार बनारसी जरीकांठी तांबडा शेला.

श्री. (क्ष) भक्ताकडून २ डोळे चांदीचे, वजन (चवलीभार).

,, बाबा रंगारी, उमरी, दोन घोडे चांदीचे, वजन १। भार.

,, (क्ष) भक्ताकडून एक छोटीशी हंडी.

,, मोहन तुकाराम पवार, नांदगांव, निशाण (सॅटीन) रंग केशरी

,, जी. मंगपतीराव, अ. स्टेशन मास्तर, हैद्राबाद, नामपट्ठण चादर चॉकलेट रंगाची नक्षीकाम केलेली.

श्री अबई गोंदकर, शिर्डी, दोन वार पिवळे सॅटीन कापड.

श्री. रंगशाई (एन. एस. रेल्वे), सी. टी. एस. ऑफीस, सिकंदराबाद, कापड (नायाळ) वार २

संस्थान भोजनगृह सेविका, श्रीमती साईमाई हिनें आपले वडिलांचे (कै. पुरुषोत्तम सखाराम उर्फ बाळासाहेब भाटे यांचे) स्मरणार्थ लहान मोठी भांडी एकंदर नग ६४ श्री चरणीं अर्पण केली.

## धर्मकृत्यें.

दर महिन्याप्रमाणें याही महिन्यांत मद्रासकडील व इकडील भक्तांचे अभिषेक, अर्चनें, लघुरुद्र, नैवेद्य, ब्राम्हण सुवासिन गरीब लोकांस अन्नदान वगैरे धर्मकृत्यें बरीच झाली.

संस्थान चिटणीस श्री. खारकर यांनी एकादशीस मुईमुगदाणे व गुळाचा प्रसाद श्रींचे आरतीचे वेळीं वाटून द्वादशीस ब्राम्हण भोजन व संस्थान कार्यवाहक व नोकर सेवेकरी यांस साखर भाताचे भोजन स्वखर्चानें दिलें.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची श्री. तुकाराम बीज. श्री. एकनाथ षष्ठी व फाल्गुन व.॥ ११ अशी तीन कीर्तनें श्रीमंदिरांत झाली. तसेंच श्रीरामनवमीचे उत्सवांत श्री. ह. भ प. दासगणू महाराज, श्री. ह. भ. प. वासुदेव बुवा कोकलगांवकर, श्री. ह. भ. प. दत्तबुवा कलमनुरीकर, श्री. ह. भ. प. मळेगांवकर, व श्री. ह. भ. प. अनंतबुवा पंढरपूरकर यांचीं किर्तनें झाली.

## मिरवणुकी

रंगपंचमी, गुढीपाडवा, रामनवमी असे तीन वेळां गावांतून श्रींचे रथाची मिरवणूक व चैत्र शु. ११ चे दिवशीं श्रीचे पालखीची मिरवणूक अशा मिरवणुकी थाटांत झाल्या.

## नवल विशेष

श्री. के. काकासाहेब दिक्षीत यांचे वाड्यांत मागील बाजूस जे नवीन खोल्यांचे बांधकाम चालू होतें तें रामनवमीस पुरें होऊन चार सुंदर हवाशीर व स्वच्छ अशा खोल्या तयार झाल्या व उत्सवांत भक्तांचे उतारास उपयोगी पडल्या.

श्रीसाईप्रधान लेंडी बागेंतील पाराचे बांधकाम पुरें झाले होतें, त्यावर सुंदरसे दीपगृह बांधून तें काम रामनवमीस पुरें झालें. हें काम श्री. सौ. सरस्वतीबाई यशवंतराव गाळवणकर वांद्रा, यांनी बांधवून श्री बाबांचे चरणीं अर्पण केलें आहे.

शिर्डी येथील हवापाणी चांगलें आहे.

---

## —एप्रिल—

चालू महिन्यांत मुंबई, पुणें, मद्रास, म्हैसूर, बेंगलूर, सिकंदराबाद, बेळगांव, हुकेरी, इचलकरंजी, नासीक, सोलापूर, ठाणें, बल्लारी, अहमदनगर, संगमनेर, कोपरगांव, वैजापूर, वगैरे ठिकाणची बरीच, भक्तमंडळी श्रींचे दर्शनास येऊन गेली.

## देणगी.

श्री. मिश्रीलाल उत्तमचंद मारवाडी, वैजापूर, तांबडी शाल.

श्री. डॉ. सुमंतराव रामचंद्र माने भांबुर्डा पुणें, पिवळे रुईफुलीकाठी उपरणें जोडी.

श्री. कु. रतनबाई श्रीधर खारकर, चरईरोड ठाणें, चांदीच्या पादुका जोड.

श्री. अन्नपूर्णाबाई दामोदर जोशी, पाणसरे हाऊस स्टेशन रोड, ठाणे गव्याचे गायमुख बसविलेले अभिषेकासाठीं शिंग.

## धर्मकृत्य व अन्नदान

नेहमींप्रमाणें भक्तांचे, अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, अन्नदान वगैरे धर्मकृत्यें झालीं.

श्री. रा. वा. चेंसास यांनीं संकष्टीचे दिवशीं मंदिरांत श्रीसाई सत्यनारायणाची पूजा केली.

श्री. नानासाहेब खारकर यानीं श्री. ह. भ. प. दासगणू महाराज व त्यांचे बरोबरची सर्व मंडळी, संस्थान नोकर, सेवेकरी व गावांतील पाटील, तलाठी, वगैरे मंडळीस शिरा भोजन सुमारें दोनशें पात्रांचें दिलें.

श्री. ह. भ. प. दासगणू महाराज यांनीही वरीलप्रमाणें सुमारें शंभर पात्रांचे भोजन दिलें व श्री. हनुमान जयंतीचे दिवशीं महार, मांग, भिल्ल वडार वगैरे लोकांस कोरडा शिधा दिला.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची श्री. संतभाऊराय कुंभार यांचे पुण्यतिथी प्रीत्यर्थ, व श्री. अक्कलकोटकर महाराज पुण्यतिथी प्रीत्यर्थ, श्री. नरसिंहजयंती प्रीत्यर्थ, वैशाख शु. ११ अशीं चार कीर्तनें झाली. चै. व॥ ११ चे दिवशीं श्री. सिन्नरकर शास्त्री यांचे, दुपारी ४ ते ६ पर्यंत कीर्तन झालें. श्री. परशराम जयंती प्रीत्यर्थ श्री. दत्तोपंत कस्तुरे यांचें कीर्तन झालें.

## नवल विशेष.

श्री. कै. दिक्षीत यांचे वाड्यांत मागील बाजूस विहिर खणण्याचे कामास ता. ८।४।४२ रोजीं भूमिपूजा होऊन प्रारंभ झाला. पाणी लवकर लागून सुमारें तीन पुरुष विहिर खोल खणली आहे. पाणी गोड लागलें आहे. बांधकामास सुरवात झाली आहे. त्याचप्रमाणें लेंडी बागेंत दरसाल झाडांना पाण्याचा तुटवडा पडतो म्हणून बागेचे पूर्वबाजूस एक मोठी विहिर खणण्याचे कामास ता. १८।४।४२ ला पूजन होऊन सुरवात झाली आहे. दीड पुरुषांत पाणी लागलें असोन खोदकाम चालू आहे.

श्री. ह. भ. प. दासगणू महाराज यांचा मुक्काम श्री. परशराम जयंती करून, येथून पुण्याकडे गेला. यंदा दोनतीन वर्षांत जाणवला नाहीं असा उन्हाळा कडक आहे, बाकी हवापाणी उत्तम आहे.

## —मे—

या महिन्यांत मुंबई, पुणें, नगर, ठाणे, मालेगांव, मद्रास, गुंडकल, जामनेर, त्रावकोर, तांबरम्, हैद्राबाद, नाशीक, म्हैसुर, कोइमतुर, सोलापूर, अनंतापूर, पेनुकोंडा धर्मावरम, कराची, इरोड, मनमाड, नागपूर, इंदोर, गुंटुर, चिंगलपट्टा, वगैरे गांवची भक्त मंडळी श्रीचे दर्शनास येऊन गेली.

## देणग्या

श्री. कै. रुक्मिणीबाई यांचे स्मरणार्थ रेशमी गलेफ उदी रंगाचा जरी फित-किनार हस्ते श्री. लक्ष्मीकांत बाळकृष्ण मालवणकर मराठा प्रेस, रामबागरोड, कराची. शिवाय, एक साधा( वेळवाचा ) पंखा

श्री. कै. बापूराव भाटे यांचे स्मरणार्थ चांदीचे फुलपात्र वजन भार (१२) हस्ते श्री. साइमायी भाटे शिर्डी.

श्री. नानाअय्या विरुपाक्ष अय्या जंगम अहमदनगर, अस्मानी रंगाचा गलेफ तांबडी फित असलेला व एक पितळी घंटा.

## धर्मकृत्यें

अभिषेक विष्णू अर्चने नैवेद्य अन्नदान वगैरे नेहमीप्रमाणें सोलापूरचे श्री. गोपाळ पिराजी उपलंग या भक्ताना श्री निंबवृक्ष पादुकेवर चोवीस तास संततधार अभिषेक बाहेर गांवचे ब्राम्हण आणवून केला.

श्री. कै. बापूराव भाटे यांचे वर्ष तिथीचे दिवशीं श्रींस नैवेद्य व पांच ब्राम्हण सुवाशिणीस भोजन श्री. साईमायी भाटे यांनीं केलें.

श्री. लक्ष्मी शंकर रासने यांचे चिरंजीवाचे लग्नाप्रित्यर्थ श्रीस महादक्षणा रु. १० नैवेद्य व ब्राम्हण सुवाशिण भोजन श्री. नानासाहेब रासने यांनीं केलें.

अधीक मासा निमित्त इतर बरेच भक्तांकडून धर्म कृत्यें झाली.

## कीर्तने

श्री. ह. भ. प. चंद्रकांत शंकर बोरकर जुन्नरकर बुवा यांनी श्रीमंदिरांत ता. ८-५-४२ रोजीं रात्रौ कीर्तनाची हजेरी दिली. संस्थान गवई यांची वैशाख वद्य ११ व अधिक ज्येष्ट शु. ११ अशी दोन कीर्तने झालीं.

## नवल विशेष

कै. दिक्षीत वाडयांतील बांधकामें:—

विहीरीचे बांधकाम पूर्ण होऊन रहाट बसवून पाणी वापरण्यास सुरवात झाली

आहे. पश्चिम बाजूस ४ खोल्या खिडक्या दरवाजे रंग सफेती होऊन उत्तम तयार झाल्या आहेत. पश्चिमेकडील जुन्या खोल्यांची स्वयंपाक घराची दुरुस्ती व वरील कौलांची दुरुस्ती होऊन तेंही काम पूर्ण झालें आहे मागील बाजूस कंपाऊंड भिंती संडास विहीरीवर फरसी व पत्र्याची शेड दरवाजा वगैरे कामें चालू आहेत.

श्री. साई प्रधान लेंडी बागेंतील कामें:—

मोठे विहीरीचे खोदण्याचें काम चालू आहे कठीण काळा दगड खालीं लागल्या-मुळें सुरुंग लाऊन खोदण्याचें काम करावें लागत आहे. पाणी उपसण्याकरितां ता. ५-५-४२ पासून मोट सुरू आहे,

शिर्डी येथील हवा पाणी उत्तम आहे उन्हाळा फारच भासतो

गो. चि. कुलकर्णी
मॅनेजर शि. संस्थान

# अनुभव

## श्री साईबाबांचें अस्तित्व.

रात्रीं दहा अकराचा सुमार असेल, नुकतीच आमची जेवणं आटोपलीं होती नी आम्ही झोंपायच्या विचारांत होतों, इतक्यांत आई कुणाजवळ तरी बोलत असल्याचं ऐकूं आलं म्हणून मी आंत डोकावुन पाहिलं, तर एक म्हातारा भुकेनं व्याकुळ झालेला असा आई जवळ जेवायला मागत होता अन् आई त्याला सांगत होती,

"बाबारे! आतांच जेवणं झाली आमची, ताजं अन्न कांहीं उरलेलं नाहीं मग?"

"बाई; जें कांहीं शिळं पाकं असेल तें वाढा पहा भुकेनं जीव कसा कासावीस झालाय तो."

"होय रे, दिसतंयना, पण शिळं कसं वाढायचं!"

"हं ऽ चालेल."

आई उठली अन सकाळचा थोडासा उरलेला भात नी अर्धी भाकरी लोणचं असं त्याला दिलं, त्यांनी तें अधाशा सारखं खाल्लं, भांडी घासून आणली नी निघून गेला.

आई डोळे उघडून पहाते तर जवळ म्हातारा नसून इतर मंडळी बोलत उभी होती नी आईला म्हणत होती कीं आज उठायला इतका उशीरसा म्हणून,

आई स्वतःशीच पुटपुटली, "म्हाताऱ्यावरून मला स्वप्नच पडलं तर...पण हें काय! आम्ही सर्व मंडळी इथं ह्या लग्न घरीं राह्यलो नि म्हणून बाबा आमचे 'श्री साईबाबा' उपाशी राहिले. अन् म्हाताऱ्याचे वेषांत आले'

इतक्यांत मी जाऊन म्हटलें आई काय झालं ग, आईनं वरील सर्व हकिकत सांगितली त्यावर मी म्हटलं

"खरंच आई उगीच आपण इथे राह्यलों, नाहीं! त्यामुळं बाबाना मात्र

उपाशी रहावं लागलं" लगेच मी हात जोडले नी म्हटलं "बाबा क्षमा करा आम्हाला.

इतक्या वेळांत लग्न घरांतील बहुतेक सर्व मंडळी आमच्या भोंवती जमून बाबांचे अस्तित्व कौतुकानं ऐकत होती

## श्री बाबांचा फोटो व उदीचे महत्व

अमावास्येची रात्र होती ती
फार होत होता उकाडा
आमच्या घरांतील निजली होती सारी मंडळी
अन मी ही त्याच तयारींत—
पण झोंप कांही केल्या येईना अन् वाटें कीं आजही होईल कां तसंच म्हणून.
किती जोरान दाबला पाय नी ओढला खसकन.
आईनं दिवा लावला नि विचारूं लागली काय झालं आणखीन नवीन म्हणुन

गेले कित्येक महिने मध्य रात्रींचे सुमारास मी ऐन झोंपेत असले कीं, कुणी तरी काळी आकृती यायची ती कधी मान दाबायची, कधीं छातीवर प्रहार करायची नी नाहींशी व्हायची, त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशीं आजारी व्हायची.

अन ह्या त्रासामुळं कितीतरी रात्रीं झोपे वाचून जायच्या अन् माझी आई माझ्या साठीं जागतही बसायची

कांही लोक ह्याबद्दल टिंगलही करायचेच, पण हे खरं होतं, मी पहात होतें नी अनुभवीतही होतें

ज्योतिषाकडे, देवऋषीकडे विचारलं गुण कांहीं येईना.

शेवटीं ठरवलं, मनाशी निश्चय केला नी श्री बाबांची उदी कपाळाला लावून झोंपायला गेलें मग मात्र त्रास होईना

तो आज हा वरील प्रकार घडला मी झोपेत असता कॉट वरून पाय खालच्या बाजुला दिसल्या बरोबर त्यांनीं ओढला नी मी घाबरून उठले.

या रात्रीपासून मी श्रीसाईबाबांचा फोटो व उदी जवळ घेऊन झोंपायला लागले नी त्या रात्री पासून मला तसा त्रास कधींही झाला नाहीं. असा आहे बाबांचे उदीचा नी फोटोचा प्रभाव.........

अन् सांगायचं म्हणजे की हा त्रास जो व्हायचा तो आमचे जे एक नातलग वारले होते त्यांचे पासून पण श्री साईबाबानी मला त्यापासून सोडवून त्रास वाचवला.

एकदां आमच्या घरांतील सर्व मंडळी न मी अशी सर्व मिळून ' आमच्या एका नातेवाईका कडे ( मुलाचा वाढदिवस ) किंवा कसला तरी समारंभ होता म्हणून गेले होतो.

समारंभ [ गप्पा गोष्टी, गाणं वगैरे ] अगदीं ऐन रंगांत आलेला नी एकाएकी माझ्या पोटांत दुखून अंग कसं अगदीं गार पडूं लागलं नी जीव कासावीस झाला मला नी आईला कांहीं सुचेना.

बोलावं तरी चोरी, न बोलावं तर जास्त होऊं लागलं.

समजूतदार असतील ती सहानुभूतिनं विचार करतील न उर्मट किंवा ज्यांना ह्या गोष्टीचा कधीं अनुभव आलेला नसतो ते कुत्सित शद्ब बोलणार

आपल्याला जर बरं वाटत नव्हतं तर यायचं काय कारण होतं, समारंभ काय अडुन रहाणार होता वगैरे.

यजमानीणबाई. तिला तर आमच्याकडे पाह्यलाही फुरसत नव्हती शेवटी आमच्या दादाना हांक मारली नी म्हटलं—

“दादा काय करूं रे कळा फार येतात.”

थांब घाबरूं नको अशी. आपल्या बाबांचा धांवा कर, न घे ही उदी खा, मग बघ बरं वाटेल.”

नी काय आश्चर्य ! तावडतोब कळा थांबल्या नी मला हुशारी वाटूं लागली अन् त्या दिवसापासून कुठंही जातांना मी श्रीसाईबाबांची उदी बरोबर घेते.

ले. लीला गो. बोले



## ॥ श्री समर्थ ॥

(लेखिका--गोविंदतनया)

१ माझा वडील नातू सहा महिन्यांचा असतांना त्याला दोन दिवस फार ताप आला व त्याचे आई वडील लहानच व अनुभवी नसल्यानें घाबरले. त्यांची वडील मंडळीही परगांवी गेली होती त्यामुळें तर फारच काळजी वाटूं लागली. मी त्याला पहाणेस गेले तेव्हां मी माझे बरोबर उदी नेली होतीच ती थोडी तोंडांत घातली व अंगाला लावली व त्याला मांडीवर घेऊन बसले बाबांचे नामस्मरण करीत. चमत्कार असा कीं, दोन दिवस सारखा अडीच पर्यंत असलेला ताप २ तासांत नॉर्मल येऊन त्याला स्वस्थपणानें झोंप लागली व तेथून प्रकृतीस आराम पडला.

२ मीं स्वतः एकदां खडावांमुळें पाय घसरून जिन्यावरून पडले, व ७।८ पायऱ्यावरून घडघडत खालीं आले. इतक्या उंचावरून पडल्यानें अतिशय मुका मार बसला व एक पायरी बरगडींत जोरानें घुसल्यामुळें कुठें तरी हाडच दुखवलें गेलें असावें, इतकें भयंकर दुखलें, व वरचा श्वास वर आणि खालचा खालीं, अशी स्थिती होऊन जीव घाबरा झाला. निजतांही येईना व बसतांही येईना, आणि रात्र कशी जाणार ही विवंचना लागली. हाडें बसविणाराला बोलावून दाखवलें, तर तो यावेळीं पहाण्यासही तयार होईना, कारण डॉक्टरनीं मला लगेच कॉफी पाजली होती! तेव्हां त्याच्या शास्त्राप्रमाणे पाणी सुद्धां पोटांत जातां उपयोग नाहीं, मार बसल्याबर. तरच त्याला परिक्षा करतां येते! असें होतें! असो सकाळपर्यंत घोन-सेट्र पहात नाहीं, डॉक्टर हार्टटॉनिक खेरीज कांहीं देत नाहींत, व घरच्या मंडळींनी भीती घातली कीं, आजचे पेक्षां उद्यां जास्ती होणार, मला तर निजतांही येईना व उठतांही येईना! आधींच इतक्या भयंकर वेदना होत होत्या कीं त्या कोसवेनांत त्यांतून जास्ती म्हणजे काय होणार, त्या कल्पनेनेंच मी अगदीं घाबरून गेले. शेवटीं बाबांची उदी उशीखालीं ठेवली, थोडी पोटांत घेतली व धांवा केला कीं मला परस्वाधीनपणा येऊं देऊं नका. व स्वतःच्या पायानें नहाणीपर्यंत जातां येऊं दे. सारखी त्यांची आठवण ठेवली म्हणजे बाबा खासच धांवून येतात व त्याप्रमाणें ह्या ही वेळीं झाले दुसऱ्यानें उठवून बसवितांनां जेथें भयंकर यातना होत होत्या, तेथें थोडीशी झोंपही लागली व पहांटे स्वतःचे पायानें धरून धरून नहाणीपर्यंत जाऊन येतां आलें व श्वासही सोप्या रितीनें घेतां येऊं लागला. रात्रीं बाबानींच माझे दुखणें कमी केलें अशी माझी अगदीं दृढ श्रद्धा आहे. त्या दिवशीं, माझा गुरुवारचा उपवास होता व मीं पूजेनंतरच पडलें होतें.

३. एकदां मोठ्या तापांतून मी उठलें व एक दिवस न्हाल्यानंतर वडनच्या दिवाणखान्यांतली मोठी गादीची खुर्ची दोन्ही हातांनीं थोडीशी उचलून पुढें सरकवली व तेवढें निमित्त होऊन डोक्यापासून कमरेपर्यंतचा भाग एकदम धरला व उगण मरल्या सारखें होऊन कांहींच हालचाल करितां येईनाशी झाली. जेवणें सुद्धां मुष्किलीचें झालें व भयंकर यातना होऊं लागल्या. एकदोन दिवसांत कामासाठीं मी परगांवी जायचें ठरविलें होतें, व माझा तर असा खोडाबिडा झाला. डॉक्टर औषधें देत होते चोळणें सुरूं होते, घरगुती उपाय सुरूं होते, पण गूण येण्याचें दिसेना. अखेर बाबांना अनन्य शरण गेलें व उदी लाऊन कसें बसें डोकें ठेवून पडलें. कारण उशीवर डोकें सुद्धां टेकतां येईना इतकी केवीलवाणी माझी स्थिति झाली होती, परंतु मी बाबांना प्रार्थना केली कीं, मला मानसिक यातना तर असह्य आहेतच पण त्यांत ह्या शारीरिक यातनांची भर पडून जीव नकोसा झाला आहे. तरी त्यांतून बरें तरी करा नाहींतर कायमची सोडवा तरी सर्वच यातनांतून! चमत्कार असा कीं जेथें डोके कसेबसें टेकलें तेथेंच उत्तम झोंप लागून पहांटेला एखादां कानमंत्र सांगावा तसें दुखणें अजीबात पळालें व सकाळीं उठतांच सर्व तयारी करून संध्याकाळीं गाडीनें ठरल्याप्रमाणें मी परगांवी गेलें, व तेथेंही पुन: दुखणें उद्भवलें नाहीं. श्री साईबाबांनीं ह्याही वेळीं प्रार्थना ऐकली.

४. कौटुंबिक परिस्थितीने व काळजीनें त्रासून हजारों वेळां साईबाबांची प्रार्थना केली व अगदीं अतिशय उदास मन होऊन निराशा वाटली कीं, दुसरे दिवशीं टपालानें उदी प्रसाद अगर साईलीला असें कांहीं येऊन जणूं काय "मी हांकेला उभा आहे" किंवा "मला तुमचें दुःख ठाऊक आहे" असेंच ते वेळोवेळीं जाणवीत असत.

५. एकदां रात्रीं १२ वाजून गेले तरी झोंप येईना व कौटुंबिक काळजीने व विशेषत: कन्येच्या भविष्यकाळाबद्दलच्या काळजीनें अंतःकरण करपून गेल्यानें कांहीं सुचेना. अशा परिस्थितींत तळमळत वेळ काढला व मध्यरात्रींनंतर झोंप लागली व एक स्वप्न पडलें. तें असें एका भयानक अरण्यांतून मी जात होतें व त्या अरण्यांत जिकडे तिकडे भयंकर सर्प पसरलेले असून मला अतिशय भीती वाटली व कोठेंच वाट दिसेना. अशावेळीं स्वप्नांतही बाबांचे स्मरण करून त्यांचे नांवाचा जप सुरु केला व काय चमत्कार! खरोखरच श्री साईबाबा तेथें प्रत्यक्ष आले व मला "भिऊं नको" असें म्हणून त्या अनेक पसरलेल्या सर्पांतून एक सर्प हातांत घेऊन त्याचे दोन तुकडे केले व मी पहाते तों सर्पाऐवजी वाळलेल्या काटक्यांचे दोन तुकडे दिसले! व आजूबाजूसही सर्व सर्प नाहींसे होऊन सर्वत्र

काटक्याच पसरलेल्या दिसल्या ! ह्या स्वप्नाचा मी असा अर्थ करते कीं, बाबांनीं मला असें सांगितलें कीं "आज जी भयंकर सर्पांसारखी दिसणारी संकटें तुझा जीव घाबरा करीत आहेत तीं तशीं नसून माझ्या हातांत त्यांची काटक्यासारखींच स्थिती होते तेव्हां माझा आधार असतांना तुला भय कसलें ? निश्चित रहा व तेंही खरें ठरलें. बाबांवेवर दृढ विश्वास ठेवून मी येणाऱ्या संकटांतून मार्ग काढला व प्रयत्नांत कसूर न करितां उद्योग केला, व अखेर बाबानीं सर्व कष्टांचे उत्तम फळ दिलें व मनाप्रमाणें सर्व घडवून आणलें.

६ एकदां मला अवघड ठिकाणीं एक बारीक फोड झाला व अतिशय त्रास होऊं लागला, मनांत नाना तऱ्हेच्या कल्पना येऊन भीतीही वाटूं लागली, व जर हें दुखणें वाढलें तर नर्स डॉक्टर वगैरेचे कडून उपचार करावे लागतील ह्या कल्पनेनें जीव घाबरा झाला. नर्सनें सांगितलेलें औषध लावणेस सुरू केलें व त्यांतच उदीही लावणेचें ठरविलें व साईबाबांचे नामस्मरण सुरूं ठेवलें हें करण्यापूर्वी हालचाल करणेंही त्रासाचें झालें होतें परंतु वरील उपायानें दुसरेच दिवशीं फोड आपोआप बसला व सर्व व्यवहार सुरक्षीत सुरूं झाले.

७ आमच्या ड्रायव्हरची मुलगी तापानें अतिशय आजारी होती. बिचारी २ वर्षांची मुलगी आई वेगळी व त्यांतून फार आजारी, त्यामुळें तिचा बाप फारच घाबरला व मलाही त्याची कींव येऊन मी बाबांची मनोभावें प्रार्थना केली कीं ही मुलगी आजारांतून उठूं दे मी त्या बापाकडून उत्सवास कांहीं पाठवीन. त्या मुलीला दररोज २ पुड्या उदी देत असे. व थोड्याच दिवसांत तिला त्या दुखण्यांतून बाबानीं बरी केली व ठरल्या प्रमाणें १ रु. उत्सवास पाठविला. आमचे घरोब्यांतील एका गृहस्थाचा एक मुलगा मॅट्रिकचे वर्गांत असतांना त्यांचे एकाएकीं डोकें बिघडलें त्याचे आईबापानीं अनेक उपाय केले तरी त्याला चांगले बरें वाटेना. मी त्याचे वडिलांना एक साईलीलेचा अंक दिला व त्यावरील बाबांचे फोटोस दररोज गंधफूल वहा व एक चांगलासा खाद्य पदार्थ, मुलगा बरा होऊन साईबाबांचे समाधीचें दर्शनास जाईपर्यंत वर्ज्य करा शिर्डीस जाऊन नैवेद्यास तो पदार्थ करून नंतर प्रसाद म्हणून खाण्यास सुरवात करा असें सांगितलें. त्यांचे सुदैवानें व बाबांच्या कृपेनें मुलगा चांगला बरा होऊन मॅट्रिक झाला व आतां त्याला घेऊन शिर्डीस नवस फेडण्यास जाण्याचे विचारांत आहेत.

असे किती तरी अनुभव प्रत्यही येत आहेत व त्यामुळें कित्येक लोकांची श्रद्धा साईबाबांचे ठिकाणी पूर्णपणें जडत आहे.

पुणें

१९६ सदाशिव पेठ

८५ भागेश्वर निवास

टिळक रोड

संपादक " साईलीला " यांस

कृतानेक नमस्कार वि. वि.--

आधुनिक संत चूडामणी श्रीसद्गुरू साईबाबा यांच्या विषयीं, अर्थात अनुभव उपलब्ध असलेली माहिती, आपणांकडे प्रसिद्ध करण्यास पाठवावी. असे विचार आज कित्येक महिने मनांत येत आहेत परंतू ते विचार आजपर्यंत मनांतल्या मनांतच राहून, प्रसिद्ध करण्याचा सुयोग आज आलेला दिसत आहे. आपल्या इच्छेनुरूप येत्या साईलीलेच्या अंकांत प्रसिद्ध करण्याची कृपा व्हावी.

वास्तविक पाहातां माझा व बाबांचा प्रत्यक्ष संबंध असा कधींही आलेला नाही बाबा ही व्यक्ति कोण होती? कशी होती ? तुमी त्यांना प्रत्यक्ष पाहिले का? वगैरे प्रश्न जर कोणी मला विचारले तर त्या सर्व प्रश्नांची उत्तरें " नाहीं " या एकाच शब्दाने द्यावी लागतील. असें असतांना बाबांच्या विषयीं माझ्या मनांत इतकें प्रेम आदर श्रद्धा कां उत्पन्न व्हावी हा मोठा प्रश्नच आहे. आणि बाबांचा प्रत्यक्ष म्हणा, किंवा अप्रत्यक्ष्य रीतीनें म्हणा ज्या योगे संबंध आला तो प्रकार असा.--

माझे परमपूज्य चुलते कै. दिनकर मोरेश्वर पारकर हे ठाणे येथें डिव्हिजनल फॉरेस्ट आफिसमध्यें नोकरीस होते. त्यांच्याकडे इ. स. १९१८ सालीं मीं शिकण्या-करतां म्हणून राहिलों त्या वेळेस मी नऊ वर्षांचा असून मराठी ४ थीं इयत्तेत होतों. ठाणें येथें असतांना घरांत होणारी बाबांची पूजा, आरती, भजन वगैरे गोष्टी पाहून अर्थातच माझ्या मनांत लहानपणापासूनच बाबांच्याविषयीं श्रद्धा उत्पन्न झाली, व बाबा हे गृहस्थ कोण, कोठें राहतात, काय करतात, वगैरे गोष्टी जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यावेळेस आमच्याकडे मला आठवतें. बाबांच्या विषयीं दोन तीन अध्याय उपलब्ध होते ते अध्याय मी पुष्कळ वेळा वाचत असे व कधीकधीं दिनकररावसुद्धां आपले स्वतःचे अनुभव सांगत असत. त्यांनी सांगितल्यापैकीं एक अनुभव खाली देत आहे.

दिनकरराव यांना दम्याचा विकार फार मोठ्या प्रमाणांत होता. तो इतका की त्यांनां चालण्याची सुद्धां पंचाईत पडत असे. डॉक्टर, वैद्य औषध दवापाणी वगैरे सर्व प्रकार झाले. परंतू दमा कमी होईना. शेवटीं अगदी कंटाळून गेले. अशा स्थितीत

असतांना त्यांच्या स्नेह्यापैकीं एकानें बाबांच्या विषयीं त्यांना माहिती सांगितली, व तुम्ही शिर्डीस जाऊन बाबांचे दर्शन घ्या असा उपदेश केला. त्याप्रमाणें ते शिर्डीस गेले. सांगण्यास कारण त्या दिवसापासून त्यांचा दमा जो गेला तो कायमचाच. पुन्हा कधींही आला नाहीं. हा त्यांचा पहिला अनुभव. तेव्हांपासून त्यांची बाबांच्या ठिकाणी पूर्ण श्रद्धा बसली. त्यानंतर ते वारंवार बाबांच्या दर्शनास शिर्डी येथें जात असत. त्यांची संतती जगत नसे. बाबांच्या कृपेनें त्यांच्या पश्चात त्यांचा एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्यें मात्र हयात आहेत

यावर कोणी असें म्हणेल की ही अंधश्रद्धा आहे. दुसऱ्यांना अनुभव आला म्हणून माझी श्रद्धा बाबांच्या ठिकाणीं बसावी हें जरा विचित्रच होय. परंतु ही अंधश्रद्धा नव्हे. मलासुद्धां माझ्या रोजच्या व्यवहारांत बाबांचे किती तरी अनुभव येत आहेत. त्यापैकीं एक खाली देतों.

मी घाटकोपर येथें असतांना माझा धाकटा मुलगा चि. शाम याला एक दिवशीं संध्याकाळीं एकाएकीं खूप ताप आला. सर्व अंग लालबुंद झालें. कोणी म्हणे गोवर आहे. कोणी म्हणे कांजण्या आहेत. वगैरे नाना तर्कवितर्क लोकांनी केले. मुलगा अगदीं जवळ जवळ बेशुद्ध स्थितींतच पडला होता. काय करावें हें सुचेना शेवटीं बाबांची उंदी माझ्याजवळ होती. ती उदी पाण्यांतून रात्रीं मुलाला पाजली व थोडी कपाळास व अंगास पावली. चमत्कार असा कीं, मुलगा सकाळीं उठुन रोजच्या प्रमाणें खेळण्यास लागला. असे पुष्कळ अनुभव रोजच्या व्यवहारांत अप्रत्यक्ष रीतीनें बाबा आपल्या भक्तांस दाखवून त्यांना संकट समयीं मदत करीत असतात, व कोणतींहि कमतरता पडून देत नाहींत. अशा तऱ्हेनें बाबानी जें म्हटलें आहे "There will be no want of food & clothings in the house of my devotee & I will be even after them in times of difficulites या बाबांच्या उक्तीची सत्यता पटते, व आनंदानें अंतःकरण भरून येते.

शेवटीं, एकनाथ महाराजांनीं जे मागणें परमेश्वराजवळ मागितले, तेच मागणें बाबांजवळ मागून अशाच तऱ्हेचे प्रेम, श्रध्दा, भक्ति बाबांच्या ठिकाणी कायमची राहो अशी बाबांच्या चरणी प्रार्थना करून मी आपला लेख पुरा करतो.

आपला कृपाभिलाषी,

**दु. वि. पाटकर**

१७-४-४२

एकनाथ महाराज म्हणतात—

देवा माझे मन लागो तुझ्या चरणीं ॥
संसार करूनी पडो नेदी ॥ १ ॥
नामस्मरण घडो संतसमागम ॥
वाउगाचि श्रम नको देवा ॥ २ ॥
पायी तीर्थ-यात्रा सुखी रामनाम ॥
हाची माझा नेम नेई सिध्दी ॥ ३ ॥
आणिक मागणे नाही नाही देवा ॥
एका जनार्दनी सेवा करणे तुझी ॥ ४ ॥

---

## ( श्री. काशीबाई कानिटकर यांजकडून )

**अनुभव १ ला.** पुष्कळ दिवसांचा अनुभव लिहावयाचा विसरून राहिला त्याची आतां आठवण झाली ती लिहून कळवीत आहे, त्याची आठवण होण्याचें कारण अनुभव वाचतांना श्री. बाबांनी पणत्यांत पाणी घालून, त्यांत वाती जाळल्याचें वाचलें त्यावरून —

१९०५ सालांत माझ्या घरीं एक नोकर शिर्डीच्या आसपास कांहीं कामाकरितां जाण्यास निघाला त्याच्याजवळ मी एक रुपया दिला, व त्यास सांगितलें कीं, ह्या रुपायांतून खडीसाखर उदबत्त्या व नारळ घे, व ते सर्व जिन्नस व उरलेले पैसे श्री. बाबांना शिर्डीस दे. त्यावेळेस श्री. बाबा दोन पैशाच्या वर कांहीं घेत नव्हते. शिवाय खडीसाखर उदबत्त्या दिल्या कीं धुनीपाशी उदबत्त्या लावून, खडीसाखर पुढें ठेवीत व तोंडानें कांहींतरी मंत्र म्हणत असत तो मंत्र बराच लांब होता. नोकरानें सांगितल्या प्रमाणें खडीसाखर नारळ व पैसे दिले तेव्हां ते पैसे बाबा सर्वांना दाखून म्हणाले कीं, आईनें मला १०॥। आणे दिले आहेत ध्यानांत ठेवा. ह्याचा अर्थ काय तो ठाऊक नाहीं नोकराचें हें करणें संपते आहे तोंच कोणीतरी एक मोठे अधिकारी आले, त्यांनींही खडीसाखर आणली होती ती बाबांच्या पुढें ठेवेली. त्या खडीसाखरेंतील एक मूठभर श्री. बाबांनीं हातांत घेतली व त्यांतील मोठ मोठे खडे धुनीच्या जाळावर पेटवून कापराच्या वड्या जशा जाळल्या तसे धुनीच्या भोंवताली ओळीनें लावले हा चमत्कार तो नोकर परत आला त्यानें मला पहिल्यांदा सांगितला. मला असें वाटलें, खडीसाखरेंत कांहींतरी ज्वालाग्राही पदार्थ असेल. म्हणून खडीसाखर मीही जाळून पाहिली परंतु माझा एक कणही पेटला नाहीं.

अनुभव १ रा. आमच्या एका आप्ताच्या घरीं चोरी झाली त्याची हकीगत अशी:—

तो स्वतां गृहस्थ परगांवीं होता त्याची बायका मुलें येथें होती. मुलामुलींना सुट्या झाल्या म्हणून तो गृहस्थ ज्या गांवीं होता त्या गांवीं जाण्याची तयारी केली. जाण्याचे अगोदर दोन दिवस आधींच त्यांनीं आवराअवर केली. चांदाची भांडीं दागदागिने एका पेटींत ठेऊन पेटीला कुलुप लावले व ती फडताळांत ठेऊन फडताळाला पण कुलुप लावले, निघायाच्या वेळेला पेटी बाहेर काढून ती बरोबर घ्यावयाची असा बेत होता. घरामध्यें ब्राम्हण नवीनच होता व जरा विक्षिप्तासारखा दिसत होता. जावयाच्या आदल्या दिवशीं सकाळीं घरांतील यजमानीन सकाळीं उठून चहा करून मुलाबाळांना घेऊन फिरावयास गेली. घरी ८ वाजतां आली, तों गड्यानें सांगितलें कीं, ब्राम्हण कुठें नाहींसा झाला आहे. घरांत ब्राम्हण नाहीं म्हणून ती आपल्या घरांतल्या कामाला लागली, जेवण खाणें झाली, संध्याकाळपर्यंत पेटीकडे कांहीं कुणाचे लक्ष गेलें नाहीं. संध्याकाळीं काहींतरी घ्यावयास फडताळापाशीं गेली तर तिच्या लक्षांत आलें कीं, फडताळाचें दार मोडलें असून पेटी नाहींशी झाली आहे. नंतर तिनें पोलिसांत वर्दी दिली, आपल्या पतीला तार केली, त्या माणसाला शोधावयास माणसें पाठविलीं असे बारा तास गेले. घरचे मालक येऊन त्यांनीं पुष्कळ शोध केला, सोलापूर पंढरपुर इकडे जाऊन आले, पुष्कळ ठिकाणीं शोध केला, शोध कांहीं लागला नाहीं. चोरी झाल्याची बातमी मला आठ दहा दिवसांनीं कळली.

मी श्री. बाबांना प्रार्थना केली " गोमांतकासुद्धां इथून जाऊन तुम्हीं एका गृहस्थाची चोरी सांपडून दिलीत. ३०–३५ हजार रुपयांच्या नोटा हरवलेल्या ठेवलेल्या जागीं सांपडून दिल्यात, माणूसही सांपडले. तुम्हीं शिर्डीहून प्रत्यक्ष प्रगट होऊन, दहा बारा दिवसांत चोरी सांपडेल म्हणून सांगितले. त्याचें जसें स्वकष्टार्जित पैसे होते. तसे ह्याचीसुद्धां कष्टाच्या पैशाची चोरी झालेली आहे लांचलुचपती वगैरेचा पैसा नाहीं. त्याचें स्वत:चें कष्टाचें पैसे आहेत, त्याच्या आजाचे व चुलत्याचेसुद्धां कष्टाचे पैसे आहेत, असें असून त्याची चोरी कां बरे सांपडूं नये, त्याची चोरी सांपडून द्या. तुमच्या कृपेने सांपडून द्या, त्यानंतर आठदहा दिवसांनीं चोरी सांपडल्याची बातमी मला कळली. चोरी कशी केली व कुठें लपवली ती गोष्ट सुद्धां ऐकण्याजोगी आहे, ती पण पुढें लिहीत आहे. चोरी सांपडली त्याची हकीगत अशी, चोरी करून गेलेला ब्राम्हण थेट स्टेशनवर गेला, व सोलापुरचें तिकीट काढून सोलापुरला गेला सोलापुरास तो आपल्या एका नातेवाईकाला व एका त्याच्या ओळखीच्या बाईला भेटला व त्याच्या

मामाच्या गांवाला गेला. चोरीच्या पेटीतली एक डबी त्यानें काढून घेतली, त्यांत आंगठ्या वगैरे असें बाकील सोने होतें. तें त्यानें सोलापुरच्या बाजारांत विकले. तेव्हां लोकांनी विचारलें, तुझ्याजवळ एवढे पैसे कुठले आले तर लोकांना सांगितले कीं रस्त्यांत मला एक लॉटरीचे तिकीट सांपडले त्याचे मला पैसे मिळाले. नंतर तो मामाच्या गांवाला जाऊन मामाला सामील करून चोरी लपवली. ही मंडळी शोध करण्या करितां सोलापुरला गेली असतां ज्यानें चोरी केली त्याचा नातेवाईक, हा त्याच्या आते भावाचा नोकर होता कांहीं दिवस. जेव्हां त्याला ही बातमी कळली कीं हे शोधाला आले आहेत, तेव्हां त्यानें व त्या बाईनें ही चोरीची बातमी दिली. मामाच्या गांवाचा पत्ता लिहून घेऊन माणसें शोधाला गेलीं. त्या खेड्यांत शोध करितां तो माणूस व मामा सांपडला. पोलिसांनीं पकडून त्याची चौकशी करतांना, मामाला माफीचा साक्षीदार कबूल करून त्याच्याकडून सर्व हकीगत काढून घेतली त्या गांवांत महादेवाच्या देवळांत भोंवतालच्या आवाराचें काम चाललें होतें, त्या आवाराच्या भिंतीच्या पायाचें खोदकाम चाललें असतांना, मध्यरात्रीं जाऊन खोल खणून ती पेटी मामा भाच्यांनीं पुरून टाकिली त्यावर पाया भरून भिंतही तीन चार फूट झाली मामांनी जागा दाखवल्यावर भिंत पाडून पाया त्यांनी खणून काढल्यावर पुरून ठेवलेली पेटी सांपडली.

बाबांच्या कृपेने, इतकी खोल पुरलेली पेटी आठ दिवसांत सामसंगीत सांपडली मुलांच्या आंगठ्या वगैरे ठेवलेली डबी तेवढी मात्र गेली. तेही पांच सहा तोळे बिनडागी सोने होतें. चोरीची खटपट त्यांची चाललीच होती तथापि प्रार्थना झाल्यावर दोनचार दिवसांतच चोराचा माग लागून आठा दिवसांत चोरी सांपडली; त्याची हकिगत वर आलीच आहे, चोरी झाली त्याचे नांव प्रसिद्ध व्हावे कीं नाहीं ही इच्छा मला ठाऊक नाहीं म्हणून नांवें कांहीं देत नाहीं, प्रार्थना मात्र मीच केली.

**अनुभव ३ रा उदीचा.** दोन वर्षांपूर्वी ज्येष्ठमहिन्यांतच बडोदा रेलवेमधील एका कामगाराची बायको लग्नाकरितां आली होती. लग्न उरकल्यानंतर त्या मला व माझ्या सुनबाईला भेटावयास आल्या, एके ठिकाणी बोलत बसलो असतांना मुलाबाळांच्या गोष्टी निघाल्या, मुलाची गोष्ट निघाल्याबरोबर त्या बाईचे डोळे पाण्यानें भरून आले. तेव्हां मी विचारलें "कां गहिंवरलांत" तेव्हां त्यांनीं तोंड वाईट करून सांगितलें "मला एकच मुलगा आहे आणि तो वर्षभर आजारी आहे" मी त्याच्या दुखण्याची चौकशी करितां तिनें सांगितलें "त्याच्या पायाला कांहीं झालें होतें त्याचें ऑपरेशन झालें, ऑपरेशन होऊन आठ दहा महिने झाले तथापि अजून जखम भरून

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थान

## विक्रीकरितां पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| (१) सच्चरित्र | | कि. रु. ३-८-० |
| (२) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी | | ,, ०-२-० |
| (३) ,, | ( अध्याय ४ ) | ,, ०-४-० |
| (४) सगुणोपासना | | ,, ०-२-० |
| (5) A glimpse of Indian spirituality by Rao Bahadur M. W. Pradhan B. A. LL. B. ADVOCATE & J. P. | | ,, 1-0-0 |
| (6) Rules:- Shirdi Sansthan of Shri Sai Baba ( English ) | | ,, 0-3-0 |
| (7) A word to South Indian devotees ( English ) | | ,, 0-1 0 |

• वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वासनीय फोटो निरनिराळ्या साइजचे वगैरे करितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घेणे.

(१) कारकून, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहाते, जि. अहमदनगर.

(२) **एडिटर साईलीला गोखले रोड ( नॉर्थ ) दादर-मुंबई १४**

(३) सौ. इंदिराबाई सुर्वेचे द्वारकामाई बाबांचे रंगित चित्र रा. रा. बाबूराव ए. सुर्वे इराणी बिल्डिंग रु. नं. ३० चिचपोकळी रोड, व्हिक्टोरिया गार्डन, मुंबई यांजकडे मिळेल.

(१) रा. रा. वामनराव प्राणगोविंद पटेल हेडमास्तर सोसायटी हायस्कूल उमरठे, जि. केरा; यांचेकडे मिळणारी पुस्तकें:—
( गुजराथी ) मनाचे श्लोक, हरिपाठ व गुरुस्मृती.

(२) डॉ. व्ही. रघुनाथ L. M. & S. बांद्रा यांचेकडे
श्री. साइनाथ भजन माला ( श्रीमती सावित्रीबाई तेंडुलकरकृत ) मिळेल.

All correspondence regarding Shri Sai Leela should be addressed to-Editor, Sai Lila, Gokhale Road (North) Dadar, Bombay.





**SANDU'S**

# HEARTINA

(Regd.)

**Specially Indicated in pain in the chest, breathlessness, Palpitation, Tachycardia and other heart Troubles**

*Bombay Branches:-* **Thakurdwar Kalbadevi, Parel & Dadar.**

**KRIMI- ✶ USEFUL IN WORMS OF CHILDREN**


**सूचना:—** कोणास जाहिराती देणें असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. **रामचंद्र वासुदेव घैसास** लो. टिळक जुबिली ट्रस्ट बिल्डिंग नं. २ गोखले रोड नॉर्थ, दादर.

---


रा. रा. **रामचंद्र वासुदेव घैसास** एडिटर श्री साईलीला यांनी लोकमान्य टिळक जुबिली ट्रस्ट बिल्डिंग न. २ गोखले रोड, दादर, मुंबई नं. १४ येथें प्रसिद्ध केलें. रा. रा. डी. पी. आगाशे यांनी '**स्वस्तिक प्रिंटर्स**' लेडी जमशेटजी रोड, दादर मुंबई. नं. १४ येथें छापिलें.